


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com

बुधवार, दि. २२ मार्च २०२३

▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १७२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८


तिसरा वनडे सामना

भारत वि. ऑस्ट्रेलिया



बुधवार
दि.२२ मार्च २०२३

वेळ : दुपारी १.३० वा.

: स्थळ :
एम.ए.चिदंबरम
स्टेडियम, चेन्नई


ISO 9001: 2015 प्रमाणित

८ जिल्हयांमध्ये ३२ शाखांद्वारे कार्यरत

॥ अर्थ करी समर्थ ॥

समर्थ सहकारी बँक लि.,सोलापूर

प्रधान कार्यालय : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर फोन : 0217 - 2744213 / 14

गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा

सोलापूर जिल्ह्यातील सर्वप्रकारच्या डिजीटल बँकींग सेवा प्रदान करणारी पहिली सहकारी बँक


MOBILE BANKING · Investment · IMPS · Deposit · E-COM · Finance · Shopping · Insurance · POS · Business · Transaction · E-PAYMENT · Transfer · Inquiry · FOREX

www.samarthbank.com


# शालेय पोषण आहारात सापडला कुपोषण करणारा प्लॅस्टिकचा तांदूळ

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी, त्यांचे आरोग्यही उत्तम राहवे, त्यांचे योग्यरीत्या शारीरिक पोषण व्हावे याकरिता राज्य शासनाने राज्यातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजना सुरू केली. मुलांना शिकवता शिकवता त्यांना तांदूळ शिजवून सकस भात खायला घालायची जबाबदारीही शिक्षकांवर येऊन पडली. ही योजना सुरळीतपणे सुरू असतानाच सांगोला तालुक्यातील घेरडीच्या शाळेत चक्क प्लॅस्टिकचा तांदूळ आढळल्याने विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये खळबळ उडाली आहे.पोषण आहाराच्या नावाखाली कुपोषण करणारा प्लॅस्टिकचा तांदूळ विद्यार्थ्यांच्या पोटात घालवून स्वत:चे पोट भरणाऱ्या भेसळबहाद्दरांबद्दल पालकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**



घेरडी(ता. सांगोला) येथील सरपंच सुरेखा यशवंत पुकळे यांनी या भेसळीचा भांडाफोड केला आहे. त्यांना रेशनच्या तांदळामध्ये पहिल्यांदा भेसळीचा हा प्रकार लक्षात आला. तांदळासारखा हुबेहूब दिसणारा प्लॅस्टिकचा तांदूळ मिसळण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी प्लॅस्टिकच्या तांदळाचे दाणे वेचून काढल्यानंतर मूळ तांदूळ आणि प्लॅस्टिकचा तांदूळ यातील फरक स्पष्टपणे जाणवला. त्यानंतर त्यांनी गावातील प्राथमिक शाळेतील तांदूळ तपासला; तेव्हा त्यातही प्लॅस्टिकचा तांदूळ मिसळण्यात आल्याचे निदर्शनास आले.

**सरपंचांनी घेतली शिक्षकांची शाळा :** भेसळीचा हा प्रकार लक्षात आल्यानंतर सरपंच सुरेख पुकळे यांनी गावातील प्राथमिक शाळेतील शिक्षकांची बैठक घेतली. असा प्लॅस्टिकमिश्रित तांदूळ विद्यार्थ्यांना देऊ नये, अशी सूचना त्यांनी शिक्षकांनी केली. संबंधित केंद्रप्रमुखांनी सोलापूर येथील अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांच्या कानावर हा प्रकार घातला. तांदळाचे नमुने तपासणीसाठी पुण्याला पाठवणार असल्याचे त्यांनी केंद्रप्रमुखांना सांगितले.

**साखळी शोधणे आवश्यक :** शालेय पोषण आहारातील तांदळामध्ये प्लॅस्टिकची भेसळ होणे ही गोष्ट निंदनीय आहे. ही बाब गंभीर स्वरूपाची आहे. विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळण्याचा हा प्रकार अत्यंत धक्कादायक आहे. या प्रकाराची योग्य ती चौकशी करून, या मागची साखळी शोधून काढली पाहिजे. दोषींना कठोर शिक्षा केली पाहिजे.

**- डॉ.बाबासाहेब देशमुख (पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष)**

**अहवाल आल्यानंतर कारवाई :** शालेय पोषण आहारामध्ये प्लॅस्टिकचा तांदूळ सापडल्याचा प्रकार घडला आहे. याबाबतच्या तक्रारी पुरवठा विभागास प्राप्त झालेल्या आहेत. या प्रकरणात पुरवठा निरीक्षकांना तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. तांदूळ कोठून खरेदी केला? खरेदी केल्यानंतर त्याच्यामध्ये प्लॅस्टिकच्या तांदळाची भेसळी केली का? किंवा तांदूळ खरेदी करतानाच त्यात भेसळ झाली का? यासंबंधीचा अहवाल पुरवठा विभागास दोन दिवसात प्राप्त होईल. त्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल.

**- विवेक साळुंखे (सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी)**

**नागरिकांच्या जिवाशी खेळणे अयोग्य :** काही तालुक्यातून अशा तक्रारी प्राप्त झाल्यानंतर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे यासंबंधीची तक्रार केली आहे. असा प्रकार पुन्हा निदर्शनास आल्यास दुकानदारांनी संघटनेशी संपर्क साधावा. प्लॅस्टिकच्या तांदळाची भेसळ करून सामान्य नागरिकांच्या जिवाशी खेळणे योग्य नाही. याबाबत संघटना या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी पाठपुरावा करेल.

**- नितीन पेंटर (जिल्हा समन्वयक, रेशन दुकानदार संघटना)**

## दर्शनासाठी निघालेल्या वाहनाचे टायर फुटून तीन तरुण ठार

### तामलवाडीजवळील घटना; अपघातात पाचजण जखमी

✔ सुराज्य/सोलापूर



**जखमींवर उपचार सुरू; एकाची प्रकृती चिंताजनक**
अपघातानंतर तीन जखमींवर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर दोघांवर खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यातील एकाची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले.

सोलापूर-तुळजापूर रस्त्यावरील कटारे फिलिंग मिलजवळ बोलेरो वाहनाचे टायर फुटून वाहन पलटी होऊन झालेल्या अपघातात नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील तीन जण जागीच ठार झाले. तर पाचजण जखमी झाले. ही घटना मंगळवारी सकाळी सातच्या सुमारास घडली. वाहनातील सर्वजण तुळजाभवानीच्या दर्शनासाठी निघाले होते.

निखिल रामदास सानप (वय-२१, रा. चास, ता. सिन्नर जि. नाशिक), अनिकेत बाळासाहेब भाबड (वय-२२, रा चास ता. सिन्नर, जि.नाशिक), अथर्व शशिकांत खैरनार(वय-२२, चास, ता सिन्नर जि. नाशिक ) अशी ठार झालेल्यांची नावे आहेत. तर गणेश नामदेव खैरनार (वय-३२), पंकज रवींद्र खैरनार (वय-३०), जीवन सुदीप ढाकणे (वय-२५), तुषार बिडकर (वय-२२), दीपक बिडकर (वय-२४, रा.चास, ता. सिन्नुर जि.नाशिक) अशी पाच जखमींची नावे आहेत. यातील जखमी तसेच मृत पावलेले तरुण मंगळवारी सकाळी तुळजापूरला( एम.एच.१५ इ.एक्स.३२ ११ ) या बोलेरो वाहनातून तुळजापूर येथे देवीच्या दर्शनासाठी निघाले होते. सकाळी सातच्या सुमारास सोलापूर- तुळजापूरच्या सीमेवर असलेल्या कटारे स्विमिंग मिलजवळ आली. त्यावेळी वेगात असलेल्या वाहनाचे टायर फुटल्याने ती पलटी होऊन तिघे मृत्यू पावले. तर तिघे जखमी झाले. जखमींना तातडीने तामलवाडी टोल नाक्यावरील रुग्णवाहिकेच्या सहाय्याने सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात आणण्यात आले. येथे तपासणी केली असता वरील तिघे उपचारापूर्वीच मृत्यू पावल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तर तिघांवर उपचार सुरू आहेत.

## जामीनदाराचा तलावात उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न

✔ **सोलापूर :** कर्जाला जामीनदार झालेल्या एका व्यक्तीने तलावात उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना विजापूर रोडवरील कंबर तलावात सोमवारी घडली.

अ. रहेमान अमीनोद्दीन बांगी (वय ४४ वर्ष राहणार सिविल हॉस्पिटल क्वार्टर, सोलापूर ) असे आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या त्या व्यक्तिचे नाव आहे. ते सिविल हॉस्पिटल मध्ये कामाला आहेत. ते अनेक कर्ज प्रकरणात जामीनदार आहेत. त्यामुळे मागील १३-१४ महिन्यापासून त्यांचा पगार बंद झाला आहे. त्यामुळे त्यांनी सोमवार रोजी सकाळी कंबर तलावात उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांच्या सहकारी मित्रांनी त्यास पाण्याबाहेर काढून येथील रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलीस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## भारतीय संघ आज विजयाची गुढी उभारणार

✔ **चेन्नई :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील शेवटचा सामना एमए चिदंबरम स्टेडियम, चेपॉक, चेन्नई येथे खेळवला जाणार आहे. या मालिकेत सध्या दोन्ही संघ १-१ ने बरोबरीत आहेत. अशा परिस्थितीत हा शेवटचा सामना मालिकेतील निर्णायक सामना ठरणार आहे. त्यामुळे भारतीय संघ हा विजयाची गुढी उभारणार का याकडे लक्ष लागले आहे.

### मोहोळजवळ जलवाहिनीला मोठी गळती

## सोलापूरचा पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता

✔ **सोलापूर :** सोलापूरला पाणीपुरवठा करणारी यशवंतसागर ते सोलापूर या जलवाहिनीला सोलापूर- पुणे राष्ट्रीय महामार्गावरील मोहोळ शहराजवळील कॉलेजच्या गेट जवळच गळती लागली आहे.

दोन तास झाले हजारो लिटर पाणी त्यातून वाया जात आहे. सोलापूर शहराला यशवंतसागर जलाशयातून जलवाहीनीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. सुमारे दोन तासापूर्वी मोहोळ शहरा जवळील बीपीएड कॉलेजला जाणाऱ्या गेट जवळच गळती लागली आहे. गळती लवकर बंद न केल्यास सोलापूर शहराच्या पाणी पुरवठ्यावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. या गळतीमुळे जवळच असलेल्या आंबा व सिताफळ या बागेत ही पाणी साचले होते.

## भांडण सोडवायला गेलेल्या महिलेला मारहाण

✔ **सोलापूर :** घराजवळील लहान मुलांचे भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या महिलेला हातोडी व सळईने मारहाण करण्यात आल्याची घटना केशवनगर झोपडपट्टी येथे मंगळवारी घडली.

नसरीन आयुब पठाण ( वय ३२ वर्ष, राहणार केशवनगर झोपडपट्टी, सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. आज मंगळवारी सकाळी घराजवळ लहान मुलांची भांडण चालू होते त्यावेळी ती ते भांडण सोडविण्यासाठी गेली असता तिला कादर रमजान चिंचोली, रमजान चिंचोली व मौला चिंचोली या तिघांनी मिळून लोखंडी हातोडी व सळईने मारहाण केली. यात मार लागल्याने तिला उपचाराकरिता दीर अल्ताफ पठाण याने येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## शहरात सलग दुसऱ्या दिवशी कोरोनाचा बळी

### दहा नवीन कोरोना रुग्ण आढळले

✔ सुराज्य/सोलापूर

**शासनाच्या नियमानुसार कार्यवाही : आयुक्त**
राज्य शासनाच्या गाईडलाईनुसार महापालिका प्रशासन काम करीत आहे. शहरात जे कोरोना पॉझिटीव्ह रुग्ण आढळत आहेत. त्यांच्या संपर्कात आलेल्यांची तपासणी करण्यात येत आहे. त्यांना क्वारंटाईन करण्यात येत आहे. सध्या रुग्णांची संख्या फारच कमी आहे जर दुर्दैवाने त्यात वाढ झाली तर आवश्यकतेनुसार महापालिकेच्या बॉईज हॉस्पिटलमध्ये रुग्णांची सोय तत्काळ करण्यात येईल, असेही मनपा आयुक्त शितल तेली - उगले यांनी स्पष्ट केले.



शहरात कोरोनाने एका तीस वर्षीय युवकाचा बळी घेतला आहे. सलग दुसऱ्या दिवशी मंगळवारी कोरोनाने एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे. एकाच दिवशी दहा नवीन कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळले आहेत.

सोलापूर शहरात मार्च महिन्यात कोरोना रुग्ण संख्या आता हळूहळू वाढत चालली आहे. सोमवार नंतर मंगळवारीही एकाचा कोरोनाने बळी घेतला आहे. शहरात एकूण ११९ जणांचे अहवाल प्राप्त झाले. त्यातील १०९ जणांचे अहवाल निगेटिव्ह तर दहा जणांचे अहवाल पॉझिटिव्ह आढळले आहेत.

त्यापैकी पाच पुरुष तर पाच स्त्रियांचा समावेश आहे. शहरात एकूण ३३ रुग्णावर उपचार सुरू सुरू असल्याचे वैद्यकिय अधिकाऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले. यापूर्वी कोरोनासंदर्भातील रुग्णांना दहा दिवस क्वारंटाईन करण्यात येत होते मात्र आता शासनाच्या आदेशानुसार ७ दिवस क्वारंटाईन करण्यात येत येत आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी दिली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांना एकमेकांशी भांडून कंटाळा कसा येत नाही?

| कल्याण |
|---|
| 570-22-679 |

| मेन बाजार |
|---|
| --- |

## महापालिका निवडणुकांचे भिजत घोंगडे कायम

### सुनावणी २८ मार्च पर्यंत लांबणीवर

✔ सुराज्य/सोलापूर



राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका निवडणुकांचे भिजत घोंगडे अद्याप कायम आहे. मंगळवारी यावर सुनावणी पार पडणार होती. मात्र आता या निवडणुका अधांतरीच राहिल्या आहेत. कारण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुनावणी लांबणीवर पडली आहे. आता ही सुनावणी पुढील आठवड्यात २८ मार्च रोजी होणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात सुनावणी मंगळवारी पार पडणे अपेक्षित होते.ऑगस्ट २०२२ पासून ही सुनावणी वारंवार पुढे ढकलली गेली आहे. यामुळे निवडणुका कधी होणार, याची उत्सुकता सर्वांना लागून राहिली होती. मात्र आता ही सुनावणी पुन्हा पुढे ढकलण्यात आली आहे. यामुळे इच्छुक उमेदवार कासावीस झाले आहेत. सोलापूरसह अनेक महापालिकेच्या निवडणुका न्यायालयीन प्रक्रियेमुळे रखडल्या आहेत.

**... तर निवडणुका जून- जुलैमध्ये?**
यावर संपूर्ण प्रक्रियेवर सुनावणी २८ मार्च रोजी होणार आहे. न्यायालयाने त्यांचा आदेश कायम ठेवल्यास, तातडीने निवडणुका घेण्याचा आणि ओबीसी आरक्षणानुसार निवडणूक घेण्याचे ठरल्यास त्या जून- जुलैमध्ये होतील, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

महापालिकेचे प्रभाग नवीन रचनेप्रमाणे तीन सदस्यांचे होणार की, जुन्या रचनेप्रमाणे चार सदस्यांचे राहणार याबाबत इच्छुक उमेदवारांमध्ये उत्सुकता लागली आहे. महाआघाडीने केलेल्या नवीन रचनेनुसार, अनेकांनी तयारी सुरू केली होती. मात्र, राज्यातील सत्तांतरानंतर भाजपने चार सदस्यांच्या प्रभाग पद्धतीने निवडणूक घेण्यात येतील, अशी भूमिका घेतली आहे. त्यामुळे इच्छुकांमध्ये कोणत्या भागात प्रचारावर भर द्यायचा, याबाबत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. चार सदस्यांचे प्रभाग होतील, असे भाजपच्या बहुतेक पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र, चार सदस्यांचा प्रभाग झाल्यास आणि मात्र, त्याला न्यायालयात आव्हान दिले जाऊ शकते. याशिवाय नवीन प्रभाग रचना करणे, त्यावर हरकती आणि सुनावणी घेणे पुन्हा आरक्षण काढणे यासाठी तब्बल दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. दुसरीकडे निवडणूक आयोगाने केलेल्या तीन सदस्यांच्या प्रभागानुसारच निवडणुका होतील, असा दावा महाविकास आघाडीच्या गोटातून केला जात आहे.

## संप काळातील कामे पूर्ण करण्यासाठी शनिवार, रविवारही कार्यालय सुरू राहणार

✔ सुराज्य/सोलापूर

जुनी पेन्शनच्या मागणीसाठी राज्य सरकारी कर्मचारी संपावर गेले होते. त्यामुळे अनेक कामे मागे राहिली. ही कामे पूर्ण करण्यासाठी आता शनिवार व रविवारीही जिल्हा परिषद सुरू असणार आहे, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी दिली.

जिल्हा परिषदेला मिळालेला २०२१-२२ चा अखर्चित निधी मार्च अखेरपर्यंत खर्च करण्यावर जिल्हा परिषद प्रशासन लक्ष केंद्रित करत आहे. त्यासाठीचे नियोजन करण्यात येत आहे. अधिकाधिक कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येणार आहे. बांधकाम विभाग, जनसुविधा, नागरी सुविधा, शाळा व अंगणवाड्या या कामांना प्राधान्य देत असल्याचे सीईओ संदीप कोहिनकर यांनी सांगितले.